|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

## रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/5/Addl.Intake/ F.Y.-2018-19/275 /2018 दिनांक: 10/07/2018

**प्रति,**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत कला, वाणिज्य, विज्ञान व समाजकार्य**

**महाविद्यालयांचे मा.प्राचार्य..**

**विषय:-** शैक्षणिक वर्ष 2018-19 करीता प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान व समाजकार्य (F.Y.B.A./F.Y.B.Com./F.Y.B.Sc./F.Y.B.S.W.) वर्गांची विद्यार्थी संख्या वाढवून देणेबाबत...

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 करीता पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा वाढीव विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता काही संलग्नीत महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केलेले आहे. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, शैक्षणिक वर्ष 2018-19 करीता प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान व समाजकार्य या वर्गासाठी (बी.सी.ए, बी.एम.एम., बी.एम.एस., बी.एम.एस.-ई-कॉमर्स., एम.बी.ए. (इंन्टीग्रेटेड) एम.सी.ए. (इंन्टीग्रेटेड) एम.एम.एस. (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट), एम.एम.एस. (पर्सनल मॅनेंजमेंट) ) यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना तसेच प्रथम वर्ष विज्ञान Biotechnology, MicroBiology, Computer Science, Biochemistry, Information Technology इ. विषय वगळून) मंजूर तुकडयांच्या अनुषंगाने विद्यापीठाने मान्य केलेल्या एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या 10% वाढीव प्रवेशासाठी मान्यता देण्यात येत आहे. सदर 10% वाढीव प्रवेशासाठी संबंधित महाविद्यालयांनी महाविद्यालयास मंजूर असलेल्या मूळ व अतिरीक्त तुकडी मंजूरी बाबतचे पत्र तसेच प्रवेश दिलेल्या व 10% वाढीव जागांवर प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार यादी संलग्नता विभागास सादर करावयाची आहे. सदरचे 10% वाढीव प्रवेश हे फक्त शैक्षणिक वर्ष 2018-19 करीता व प्रथम वर्षाकरीताच मंजूर करण्यात आलेले आहेत यांचीही नोंद घ्यावी.

10% प्रवेशित करावयाच्या वाढीव विद्यार्थ्यांकरीता प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी प्रती विद्यार्थी रु. 300/- (रुपये तीनशे मात्र) व प्रथम वर्ष समाजकार्य अभ्यासक्रमासाठी रु. 600/- (रुपये सहाशे मात्र) अतिरीक्त संलग्नता शुल्क म्हणून विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडे बॅकर्स चेकव्दारे/धनाकर्षाव्दारे जमा करणे आवश्यक आहे. सदर वाढीव विद्यार्थ्यांचे शुल्क संलग्नता विभागामार्फत विद्यापीठाच्या वित्त विभागात जमा केल्यानंतर मंजूर करण्यात आलेल्या वाढीव विद्यार्थ्यांची माहिती समन्वयक, ई-सुविधा केंद्र, उ.म.वि.जळगाव यांना कळविण्यात येईल व त्यानंतरच वाढीव प्रवेशाची नोंद ई-सुविधाच्या ऑनलाईन पध्दतीव्दारे करण्यात येईल. तसेच सदरचे अतिरीक्त संलग्नता शुल्क भरणा केल्याची पावती पात्रता विभागास सादर केल्याशिवाय सदर विद्याथ्यांचे पात्रता अर्ज स्विकारले जाणार नाहीत. सदरचे अतिरीक्त संलग्नता शुल्क महाविद्यालयाने अदा करावयाचे असून, **सदर रक्कम कोणत्याही सबबीवर विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात येवू नये.**

वाढीव विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर शैक्षणिक गुणवत्ता ढासळणार नाही यासाठी महाविद्यालयांने आवश्यक त्या सोयीसुविधा, तत्सम बाबींची उदा. वर्गखोल्या, प्रात्यक्षिकसाठी आवश्यक उपकरणे, ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या इ. गोष्टींची पूर्तता करणे बंधनकारक राहील. सदर बाबींची पूर्तता महाविद्यालयाने न केल्यास व विद्यार्थ्यांकडून याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, त्याचप्रमाणे काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्या बाबीची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची व पर्यायाने महाविद्यालयाचे मा.प्राचार्यांची राहील. तसेच, जी महाविद्यालये शैक्षणिक वर्ष 2018-19 साठी जलदगती पध्दतीने अतिरीक्त तुकडी मंजूरीचा प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनास सादर करतील व त्यापैकी ज्या महाविद्यालयांना जलदगती पध्दतीने अतिरीक्त तुकडया मंजूर होतील अशा महाविद्यालयांना मंजूर करण्यात येत असलेले

**(कृ.मा.प.)**

अतिरीक्त विद्यार्थी महाविद्यालयांनी अतिरीक्त तुकडीमध्ये वर्ग करावयाचे आहेत व फक्त उर्वरित रिक्त जागांच्या प्रवेशासाठी विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे. तथापि, सदर अतिरीक्त वाढीव प्रवेशासाठी भरलेले अतिरीक्त संलग्नता शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाहीत किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या शुल्कात (Fee) मध्ये समायोजित केले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

**Sd/-**

**(जी.एन.पवार)**

उपकुलसचिव

शैक्षणिक विभाग(संलग्नता विभाग)

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**<u>प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-</u>**

1) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, उमवि., जळगांव.

2) मा.उपकुलसचिव/सहा.कुलसचिव, परीक्षा विभाग, उमवि, जळगांव.

3) मा.संगणक केंद्रप्रमुख, परीक्षा विभाग, उमवि, जळगांव.

4) मा.उपकुलसचिव, अभ्यासमंडळे व प्रवेश पात्रता विभाग, उमवि, जळगांव.

आपणास विनंती की, महाविद्यालयांचे पात्रता/परीक्षा अर्ज स्विकारतांना महाविद्यालयांनी प्रवेशित केलेल्या 10 % अतिरीक्त विद्यार्थी संख्येसाठी प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान वर्गासाठी प्रती विद्यार्थी रु. 300/- (रुपये तीनशे मात्र) व प्रथम वर्ष समाजकार्य अभ्यासक्रमासाठी प्रती विद्यार्थी रु. 600/- (रुपये सहाशे मात्र) इतकी रक्कम भरली असल्याची खातरजमा करावी.

5) मा.समन्वयक, विद्यार्थी ई-सुविधा केंद्र, उमवि, जळगांव.

आपणास विनंती की, महाविद्यालयांनी अतिरीक्त विद्यार्थ्यांचे अतिरीक्त संलग्नता शुल्क संलग्नता विभागामार्फत वित्त विभागात जमा केल्यानंतर वाढीव प्रवेशा बाबतची माहिती आपणास वेळोवेळी कळविण्यात येईल व त्यानंतरच सदरचे वाढीव प्रवेशांची नोंद करण्याची सुविधा संबंधित महाविद्यालयांना उपलब्ध करुन देण्यात यावी, ही विनंती.

Sd/-

**(जी.एन.पवार)**

उपकुलसचिव

शैक्षणिक विभाग(संलग्नता विभाग)

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

प्रतिलिपी:-

1) मा.कुलगुरु कार्यालय, उ.म.वि., जळगांव.

2) मा.कुलसचिव कार्यालय, उ.म.वि., जळगांव.

3) मा.वित्त व लेखा अधिकारी, उ.म.वि., जळगांव.